THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 29TH AUGUST 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

**सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट याचा, सरकाराकडून दिलेल्या इनामांच्या संबंधापुरता, खुलासा करण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा.**

ज्याअर्थी सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट याच्या व्याप्तीविषयीं व अमलाविषयीं शंका उत्पन्न झालेल्या असून त्या दूर करणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास, सन १८९९ चा सरकारी इनामांबाबदचा आक्ट, असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबदचा आक्ट सरकारी इनामांस लागू नाहीं.

२. (१) सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट यांतील कोणताही मजकूर, महाराणीसाहेब कैसरेहिंद, त्यांचे वारस किंवा स्थानापन्न यांकडून किंवा यांच्यावतीनें, किंवा हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांकडून किंवा यांच्यावतीनें, कोणत्याही मनुष्यास किंवा मनुष्याकरितां जमीन किंवा तींतील कोणताही हितसंबंध आजपर्यंत इनामादाखल दिलेला असेल किंवा यानंतर देण्यांत येईल किंवा आजपर्यंत तबदील करून दिलेला असेल किंवा यानंतर तबदील करून देण्यांत येईल त्यास लागू होणार नाहीं, किंवा तो मजकूर सदरहू प्रकारच्या इनामास किंवा तबदिलीच्या बाबतीस कधींही लागू होता असें समजूं नये; परंतु अशा दरेक इनामाच्या व तबदील करून देण्याबाबदच्या लेखाचा अर्थ सदरहू आक्ट पसार झालाच नाहीं अशा रीतीनें केला पाहिजे आणि त्याचा अमल त्याचप्रमाणें चालेल असें समजावें.

(२) सदरीं सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही इनामाच्या किंवा तबदील करून देण्याबाबदच्या लेखांतील सर्व ठराव, अटी, शर्ती व दुसऱ्यास हक्क करून देण्याबाबदचे ठराव, कायद्याचा कोणताही नियम किंवा कायदे करणाऱ्या मंडळीचा कोणताही कायदा उलट पक्षीं असला तथापि, कायदेशीर आहेत व त्यांच्या आशयाप्रमाणें त्यांचा अमल चालेल असें समजावें.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट याच्या १०–१२ या कलमांवरून, ज्यास मिळकत तबदील करून दिली असेल त्याकडून तिची विक्रीवगैरे झाली असतां तिजवरील त्याचा हक्क बुडेल अशा अर्थाच्या सर्व शर्ती, आणि याप्रमाणें विक्रीवगैरे झाली असतां किंवा तो मनुष्य कोणत्याही प्रकारें नादार झाला असतां किंवा त्यानें त्या मिळकतीची विक्रीवगैरे करण्याचा प्रयत्न केला असतां त्या मिळकतीवर दुसऱ्याचा हक्क होईल अशा अर्थाचे सर्व ठराव, कांहीं बाबती खेरीज करून, निरुपयोगी आहेत असें ठरविलें आहे. सदरहू आक्टांत सरकाराविषयीं स्पष्टपणें उल्लेख केलेला नाहीं, आणि सरकारच्या मुखत्यारीस, विशेषेंकरून सरकारी नौकरीबद्दल इनामें देण्याच्या बाबतींत विक्रीवगैरे करतां न येण्याजोग्या जहागिरींचा हक्क उत्पन्न करण्याच्या संबंधानें त्याच्या मुखत्यारीस, अशा प्रकारचा प्रतिबंध करण्याचा इरादा नव्हता असें गृहीत घेतां येईल; परंतु स्पष्ट कायदा करून या प्रकरणाचा खुलासा केला असतां विशेष चांगलें होईल असा विचार झाला आहे.

२. अलीकडे एका प्रसंगीं हिंदुस्थान सरकारास असा सल्ला मिळाला कीं, सरकारानें इनामादाखल दिलेली कोणतीही जमीन विवक्षित वेळापर्यंत वंशपरंपरेनें अविभाज्य राज्याप्रमाणें वहिवाटीनें चालत आलेली नसल्यास विक्रीवगैरे करतां न येण्याजोगा व अविभाज्य असा हक्क तिजमध्यें उत्पन्न करण्याचा सरकारास अधिकार नाहीं. ही गैरसोई दूर करण्याच्या इरादानें मसुद्याच्या दुसऱ्या पोट-कलमांत, सरकारी इनामें देण्याबाबदच्या लेखांचा अर्थ, कायद्याच्या ज्या कोणत्याही नियमावरून त्यांचा अमल चालण्यास एरव्हीं बाध येता तसा कोणताही नियम असला तथापि, त्यांच्या आशयाप्रमाणें केला पाहिजे असें ठरविलें आहे.

तारीख २४ माहे जुलै सन १८९९.

ए. ई. विलर.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारणें इष्ट आहे, त्या अर्थी ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदरहू कायद्याच्या २३० व्या कलमांत खालील मजकूर जास्त दाखल करावा: तो येणेंप्रमाणें.— सदरहू कायद्याच्या २३० व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"जो कोणताही धातूचा तुकडा, कोणत्याही वेळीं, वर व्याख्या केल्याप्रमाणें राणीसाहेबांचें नाणें होता, त्याचा पैका ह्मणून उपयोग करण्याचें बंद झालेलें असलें तरी, त्याला ह्या बाबीच्या कारणांसाठीं, राणीसाहेबांचें नाणें समजलें पाहिजे."

सदरहू कलमास जोडलेल्या उदाहरणांमध्यें खालील उदाहरण जास्त दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

"(९) "फरक्काबादी रुपया," ज्याचा इंडिया सरकारच्या हुकुमावरून पैका ह्मणून पूर्वीं उपयोग करण्यांत येत होता, त्याचा त्याप्रमाणें आतां उपयोग करण्यांत येत नाहीं तरी, तो राणीसाहेबांचें नाणें होय."

### हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याचें २३० वें कलम हल्लीं आहे त्याप्रमाणें ह्मटलें ह्मणजे, ज्या धातूच्या तुकड्यांस "नाणें" व "राणीसाहेबांचें नाणें" ह्मणण्यांत येत असेल, त्या तुकड्यांस त्या कलमांत दिलेल्या व्याख्या लागू करावयाच्या असल्यास त्या तुकड्यांचा "चालू वेळीं पैका ह्मणून उपयोग करण्यांत येत असला" पाहिजे. सन १८७० चा हिंदुस्थानचे नाण्यांचा आक्ट ह्यावरून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून त्याच्या द्वारें, कोणतेही तारिखेचीं व कोणतेही नांवाचीं नाणीं परत मागतां येतात. ह्याप्रमाणें कोणत्याही नांवाचें नाणें परत मागण्यांत आलें ह्मणजे, किंवा निदान त्यानंतर कांहीं वेळानें तें बरेंच दुर्मिळ झालें ह्मणजे, त्याविषयीं, "त्याचा चालू वेळीं पैका ह्मणून उपयोग करण्यांत येत नाहीं" असा ठराव होणें असंभवनीय नाहीं. तथापि, अशा जातीचें नाणें परत मागण्याच्या आधीं त्यासंबंधानें जशी दगलबाजी करितां येते, तशीच दगलबाजी तें परत मागितल्यानंतरही करितां येते ह्मणून, नाणें परत मागण्याच्या आधीं ज्या कारणावरून तें नकली करण्याची मनाई करावी लागते, तींच कारणें, तें नाणें सदरहूप्रमाणें परत मागितल्यानंतर—निदान त्या नाण्यास जुन्या नाण्यांस जी किंमत येत असते तीहून इतर किंमत येईनाशी होई तोंपर्यंत—तें नकली करण्याच्या बाबतींत लागू पडतात.

२. पूर्वीं, फरक्काबादी रुपये हिंदुस्थान सरकारच्या हुकुमाअन्वयें बंगाल्यामध्यें कायदेशीर नाणें ह्मणून उपयोगांत होते. ते इ० स० १८७७ सालीं परत मागितल्याकारणानें, त्यांना, "नाणें" शब्दाची जी व्याख्या हल्लीं चालू आहे ती लागू होत नाहीं. कांहीं देशी संस्थानांमध्यें हल्लीं ह्या रुपयांचा पैक्याप्रमाणें उपयोग अगदींच बंद झालेला नाहीं (किंवा नुकता कांहीं दिवसांवर बंद झालेला नव्हता). हे रुपये आलीकडे मुंबईमध्यें पुष्कळ तयार करीत असत, आणि हें तयार करण्याचें काम बंद करण्यासाठीं कायद्याचा अधिकार मिळविणें जरूर आहे असें वाटत आहे.

तारीख ११ जुलई सन १८९९.

जे. वेस्टलंड.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.